**GOVERNMENT OF KARNATAKA**

KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD

**MODEL QUESTION PAPER - 1**

Class: II Year PUC　　Academic Year: 2024 -25

Subject: Marathi (07)　　Maximum Marks : 80

Time: 3.15 Hrs.　　No. of Question: 42

---

**सूचना :** 1. हस्ताक्षर स्वच्छ व सुबक असावे.

2. उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

**प्रश्न I - खालील प्रश्नातील वाक्यासाठी योग्य पर्यायाची निवड करून लिहा.** **(10 x 1 = 10)**

१. आईने बालकाला कोणाकडे दिले ------------------------

A) साधूकडे　B) गोसाव्याकडे　C) वडिलांकडे　D) मुलाकडे

2. सईच्या पतीचे नाव ----------------------------

A) रामा　B) नामा　C) शामा　D) तुका

3. चिपको आंदोलनाचे नेतृत्व यांनी केले ---------------------

A) सुंदरलाल जोशी　B) पुरंधर बहुगुणा　C) महालाल बहुगुणा　D) सुंदरलाल बहुगुणा

4. आजीला मुकांबिका  हे नाव कोणी ठेवले --------------------

A) वडील　B) आई　C) मावशी　D) पणजोबा

5. आजीला या झाडाची उपमा दिली -------------------

A) पिंपळ　B) आंबा　C) फणस　D) निलगिरी

6. संसाराला कशाची उपमा दिली ---------------------

A) पावसाची　B) मृगजळाची　C) आकाशाची　D) सुखदुःखाची

7. संत सेना न्हावी यांनी यांना गुरु मानले ------------------------

A) संत नामदेव　B) संत एकनाथ　C) संत ज्ञानेश्वर　D) संत तुकाराम

8. सून या देवीची प्रार्थना करते --------------------------

A) भवानी देवीची B) अंबाबाई देवीची C) लक्ष्मी देवीची D) गौराई देवीची

9. सखीने जेवण संपता संपता हे मागितले -------------------------

A) दही ताक B) भाजी आमटी C) तूप D) दूध

10. "अजून पान वाढायला येत नाही" असे कोण म्हणाले -------------------

A) आई B) नवरा C) वडील D) सखी

**ब) खालील कंसात दिलेले योग्य शब्द निवडून लिहा.** **( 5 x 1 =5 )**

11. रमेश या शब्दाची विभक्ती ---------------

12. पारा चढणे ---------------

13. पदर पसरणे --------------

14. श्रम न करता खाणारा ---------------

15. शेरास -------------------

(याचना करणे, खूप राग येणे, सव्वाशेर, ऐतोबा, प्रथमा विभक्ती, द्वितीया विभक्ती)

**16. क) खालील 'अ' गटात पाठांची नावे दिली असून 'ब' गटात लेखकांची नावे दिली आहेत योग्य त्या जोड्या जुळवा.** **(5 x 1 = 5)**

| अ | ब |
|---|---|
| I) पाझर | a) योगीराज वाघमारे |
| II) गळफास | b) संत एकनाथ |
| III ) होरपळ | c) आप्पासाहेब खोत |
| IV) सत्वर पाव गे मला | d) शांता शेळके |
| V) ही मुले .. .. .. त्याचे हे वय | e) राजन गवस |
| | f) वामन निंबाळकर |

**प्रश्न II अ) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (1 x 5 = 5)**

17. शाहू महाराजांनी अंमलात आणलेल्या मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याविषयी लिहा.

18. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तीन गुरुविषयी माहिती लिहा.

19. संत तुकारामांनी मानवी जीवनासंबंधी केलेले भाष्य लिहा.

**ब) संदर्भासह स्पष्ट करा. ( कोणतेही दोन) (2 x 3 = 6)**

20. “मग तीएसि आणि तेयासि बुझावणी केली”

21. “कुणबी घर धरून जीव मात्र घेऊन राहिले आहेत तेही जाऊ लागतील”

22. “नोकरीसाठी मिन्नतवारी करावी, हे माझ्या स्वभावातच नव्हतं”

23. “नले मी - मी चोरी केली असा संशय आला तुला.”

**क) टीपा लिहा (कोणत्याही दोन) (2 x 4 = 8)**

24. वीर राणी कित्तूर चन्नम्माचे बालपण व विवाह याविषयी लिहा.

25. सई विषयी थोडक्यात माहिती लिहा.

26. प्रदूषणावर उपाय नाही का? या पाठातील प्रदूषणावर उपाय लिहा.

27. वाढाळू वयातील मुलांच्या बाबतीत पालकांची कर्तव्ये लिहा.

**प्रश्न III अ ) खालीलपैकी एका प्रश्नाचे उत्तर सविस्तर लिहा. (1 x 4 = 4)**

28. गोफ कवितेचा भावार्थ लिहा.

29. ‘रात्र आहे वैऱ्याची’ या कवितेतून कवीने कोणती आव्हाने सांगितली आहेत.

30. ‘विसाव्या शतकाच्या शेवटच्या टोकावर’ या कवितेतील नायकाने पाहिलेला भविष्यकाळ लिहा.

**ब): संदर्भासह स्पष्ट करा. (कोणतेही दोन) (2 x 3 = 6)**

31. जे खळांची व्यंकटी सांडो | तया सत्कर्मी रती वाढो |

भूता परस्परे पडो | मैत्र जीवाचे |

32. “ऐक राया तू थोर दयासिंधू

नीति सागरही तुचि दीनबंधू”

33. "सहज भावाचा आत्मैक्य कुडल संगम देव एकच देव"

**क) टीपा लिहा (कोणत्याही दोन)** **(2 x 3 = 6)**

34. 'आई' या कवितेतून आईचे अस्तित्व कवीने कसे स्पष्ट केले आहे ते लिहा.

35. 'निष्ठा' या कवितेतील बापाची निष्ठा स्पष्ट करा.

36. 'जीव माझा गुंतलाय' या कवितेतील बाळी विषयी माहिती लिहा.

37. 'सुंदर हिरवे माळ' या कवितेतील निसर्ग चित्रण लिहा.

**IV अ) खालील तीनही प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(5 x 3 = 15)**

38. गावातील पोरांनी बाबलला का मारले त्याची अवस्था कशी झाली?

39. तात्याचे सामाजिक कार्य लिहा.

40. पंडिताला कोण कोणत्या वाईट गोष्टींच्या सवयी लागल्या होत्या ? त्याचा परिणाम काय झाला?

**V खालील विषयावर तक्रार अर्ज लिहा.** **(1 x 5 = 5)**

41. तुमच्या गावात डेंगीची साथ आलेली आहे. लोक आजारी पडत आहेत तरी गावातील स्वच्छता करण्याबाबत ग्रामपंचायत अध्यक्षांना तक्रार अर्ज लिहा.

**VI खालील विषयावर निबंध लिहा.** **(1 x 5 = 5)**

42. हुंडा- एक सामाजिक समस्या

किंवा

वृक्षवल्ली आम्हा सोयरी

000000000000000